


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२४७ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि.२९ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

# विमाने बॉम्बने उडवण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीची नागपूर पोलिसांनी ओळख पटवली

## दोन व्यक्ती देत होती विमाने उडवण्याची धमकी; पंतप्रधान मोदी, एकनाथ शिंदेंना पाठवले ईमेल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ नागपूर**

गेल्या काही दिवसांपासून विमानांमध्ये बॉम्ब असल्याच्या अफवांमुळे देशभरात विमान प्रवाशांमध्ये दहशतीचे वातावरण आहे. या बॉम्बच्या अफवांमुळे विमान वाहतुकीवर मोठा परिणाम झाला तसेच मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानही झालं. मात्र आता या प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. विमाने बॉम्बने उडवण्याची धमकी देणाऱ्या व्यक्तीची नागपूरपोलिसांनी ओळख पटवली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, धमक्या देणारा व्यक्ती गोंदिया येथील आहे.

विमानांमध्ये बॉम्ब असल्याचे सांगत विमान कंपन्यांना धमकावण्याचा प्रकार थांबलेला नाही. २६ ऑक्टोबरपर्यंत १३ दिवसांत देशातील विमान कंपन्यांच्या ३०० हून अधिक विमानांना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या होत्या. बहुतेक धमक्या सोशल मीडियाच्या माध्यमातून दिल्या गेल्याचे समोर आलं होते. तसेच २२ ऑक्टोबर रोजी इंडिगो आणि एअर इंडियाच्या प्रत्येकी १३ फ्लाइटसह सुमारे ५० फ्लाइट्सना बॉम्बच्या धमक्या मिळाल्या होत्या. त्यामुळे सरकारचे धाबे दणाणले आहे. या सततच्या धमक्यांमुळे अनेक उड्डाणांना उशीर होत आहे.



त्याचबरोबर विमानतळ आणि इतर आस्थापनांवरही सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली आहे. मात्र आता नागपूर पोलिसांनी या धमक्या देणाऱ्या व्यक्तीची ओळख पटवली आहे.

जगदीश उईके असे नाव असलेल्या व्यक्तीची नागपूर पोलिसांच्या विशेष शाखेने ओळख पटवली आहे. जगदीशला २०२१ मध्ये एका प्रकरणात अटक करण्यात आली होती. विशेष म्हणजे उईकेने याआधी दहशतवादावर एक पुस्तकही लिहिले आहे. ओळख पटल्यानंतर जगदीश उईके हा सध्या फरार असल्याची माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. पोलिस उपायुक्त श्वेता खेडकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या तपासात उईके याच्या ईमेलशी संबंधित महत्त्वाची माहिती समोर आली आहे.

जगदीश उईकेने पंतप्रधान कार्यालय, रेल्वे मंत्री, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, एअरलाइन कार्यालये, पोलीस महासंचालक (डीजीपी) आणि रेल्वे संरक्षण दल (आरपीएफ) यासह विविध सरकारी संस्थांना ईमेल पाठवले होते. दुसरीकडे, एका गुप्त कोडची माहिती न दिल्यास ठार मारले जाईल, अशी धमकी देणारा ईमेल उईके यांनी पाठवल्यानंतर सोमवारी नागपूर पोलिसांनी उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागपुरातील निवासस्थानाबाहेर सुरक्षा वाढवली होती. उईकेने पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटून दहशतवादी धोक्यांबाबत त्याच्याकडे असलेल्या माहितीवर चर्चा करण्याची विनंती केली. उईकेने २१ ऑक्टोबर रोजी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि आरपीएफला पाठवलेल्या ईमेलनंतक रेल्वे स्थानकांवरील सुरक्षा व्यवस्था वाढवण्यात आली होती.

दरम्यान, उईकेला अटक करण्यासाठी एक विशेष पथक तयार करण्यात आले आहे आणि लवकरच त्याला अटक केली जाईल, अशी माहिती पोलिस उपायुक्त श्वेता खेडकर यांनी दिली.

# महायुतीत काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती रंगणार चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले संकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी शेवटचा काही वेळ शिल्लक राहिला असला तरी महायुती आणि महाविकास आघाडीमधील जागावाटप काही अंतिम टप्प्यापर्यंत पोहोचू शकलेलं नाही. त्यात महायुती आणि महाविकास आघाडीमधील घटक पक्षांच्या नेत्यांनी अनेक मतदारसंघांत मित्रपक्षांच्या उमेदवारांविरोधात बंडखोरी केली आहे. त्यामुळे या बंडखोरांना आवरण्याचं आव्हान सर्वच पक्षांसमोर उभं राहिलं आहे. काही ठिकाणी बंडखोरी आवरण्याऐवजी मैत्रिपूर्ण लढतींचेही संकेत मिळत आहेत. दरम्यान, महायुतीमध्ये काही मतदारसंघात मैत्रिपूर्ण लढती अपरिहार्य असल्याचं सूचक विधान भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केलं आहे.

आज उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी निघाल्यावर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले की, महायुतीमध्ये



अत्यंत चांगल्या पद्धतीने जागावाटप झालं आहे. मात्र आज दुपारी तीन वाजेपर्यंत चित्र स्पष्ट होईल. मात्र राज्यात महायुतीमध्ये काही ठिकाणी मैत्रिपूर्ण लढती होण्याची शक्यता आहे. ज्या मतदारसंघांमध्ये मैत्रिपूर्ण लढती होतील, त्या जागा महायुतीकडून जाहीर होतील, असेही असेही बावनकुळे यांनी सांगितले.

# शरद पवारांकडून अजित पवारांची नक्कल सहा महिन्यांपूर्वीच्या टीकेचा घेतला समाचार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९बारामती**

बारामती विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार युगेंद्र पवार यांच्या प्रचारार्थ आयोजित एका सभेत बोलत असताना ज्येष्ठ नेते व या पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची नक्कल करत त्यांना चिमटा काढला आहे. शरद पवारांनी अजित पवारांची नक्कल करत त्यांनी सहा महिन्यांपूर्वी केलेल्या टीकेला जशास तसं प्रत्युत्तर दिलं आहे. शरद पवारांनी यावेळी अजित पवारांची डोळे पुसतानाची नक्कल करून दाखवली. त्यानंतर सभेला उपस्थित लोकांमध्ये एकच हशा पिकला होता. युगेंद्र पवार यांच्या प्रचारसभेतून शरद पवारांनी थेट



अजित पवारांना लक्ष्य केलं.

सहा महिन्यांपूर्वी लोकसभा निवडणुकीवेळी अजित पवार यांनी केलेली भाषण आठवून पहा, असं शरद पवार म्हणाले. पवारांनी जनतेला आठवण करून दिली की अजित पवारांनी काही महिन्यांपूर्वी दावा केला होता की साहेब (शरद पवार) तुम्हाला भावनिक करतील, डोळ्यात पाणी आणून मत द्या म्हणतील, मात्र कालच्या सभेत त्यांनी काय केलं ते सर्वांनीच पाहिलं आहे, असं शरद पवार म्हणाले.अजित पवार यांनी काल बारामतीमध्ये सभा घेतली होती. यावेळी युगेंद्र पवार यांच्या उमेदवारीबद्दल बोलताना अजित पवार यांच्या डोळ्यात अश्रू तरळले होते. बोलताना त्यांचा कंठ दाटून आला होता, त्यांनी आवंढा गिळला, भाषण थांबवलं, पाणी प्यायले आणि त्यानंतर त्यांनी आपलं भाषण चालू ठेवलं. अजित पवारांच्या याच कृतीवरून शरद पवारांनी आज त्यांना चिमटा काढला.

# अजितदादांचा भाजपला धक्का; विरोध असतांनाही नवाब मलिकांना उमेदवारी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९मुंबई**

ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार यांनी भाजपला मोठा धक्का दिलाय. अजित पवारांनी मानखुर्द विधानसभा मतदारसंघातून नवाब मलिक यांना उमेदवारी दिलीय. भाजप नेते नवाब मलिक यांना उमेदवारी देण्यास सतत विरोध करत होते. तरीदेखील अजित पवारांनी त्यांना रिंगणात



उतरवलं आहे. अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून पक्षाचे जेष्ठ नेते नवाब मलिक यांनी आज मानखुर्द शिवाजी नगर मतदार संघातून उमेदवारी अर्ज दाखल केलाय.

भारतीय जनता पक्षाच्या राजकीय दबावाला न जुमानता अजित पवार यांनी मुंबईत नवाब मलिक यांना मानखुर्द विधानसभा मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. उमेदवारी अर्ज भरणाऱ्या शेवटच्या दिवशी नवाब मलिक यांना मानखुर्द जागेसाठी राष्ट्रवादीकडून एबी फॉर्म देण्यात आले आहेत. नवाब मलिक आता या जागेवरून महायुतीचे उमेदवार आहेत. याकडे मोठी राजकीय खेळी म्हणून पाहिलं जातंय.उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर नवाब मलिक म्हणाले की, अपक्ष आणि राष्ट्रवादीच्या अर्जावर मी माझे नाव दाखल केले आहे. राष्ट्रवादीचा उमेदवारी अर्ज परत आल्यास मी अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूक लढवणार आहे. नवाब मलिक हे अणुशक्तीनगरचे विद्यमान आमदार आहेत. त्यांना तिकीट न देण्यासाठी भाजपकडून सातत्याने दबाव आणला जात होता. दरम्यान नवाब मलिक यांनी मानखुर्दमधून निवडणूक लढवण्याची घोषणा केलीय.

# उमेदवारी अर्ज भरण्यासाठी गेले अन् फडणवीसांचा फोन आला, जगदीश मुळीकांचा यू-टर्न

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९पुणे**

पुणे वडगाव शेरी विधानसभा मतदारसंघात महायुतीमध्ये बिघाडी झाल्याचं चित्र निर्माण झालं आहे. अजित पवारांच्या पक्षाचे विद्यमान आमदार सुनील टिंगरे यांना या मतदारसंघातून उमेदवारी जाहीर झाली असतानाच, मात्र आता भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक यांना देखील पक्षांनी एबी फॉर्म देण्यात आला होता. ते वडगाव शेरी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल करणार होते. त्यामुळे या मतदारसंघात महायुतीमध्ये



मैत्रीपूर्ण लढत होण्याची शक्यता वर्तवली जात होती. मात्र, जगदीश मुळीक यांनी यु टर्न घेतला आहे.

भाजपचे माजी आमदार जगदीश मुळीक यांना भाजपकडून एबी फॉर्म देण्यात आला. ते फॉर्म घेऊन अर्ज भरण्यासाठी येरवड्याच्या क्षेत्रीय कार्यालयात दाखल झाले. मात्र उमेदवारीचा अर्ज भरण्यापूर्वी देवेंद्र फडणीस यांचा फोन आला आणि जगदीश मुळीक यांनी यु-टर्न घेतला. वरिष्ठांनी आदेश दिले भाजपात दिलेल्या आदेशांचं पालन केलं जातं. आम्हाला पुन्हा एकदा महायुतीचं सरकार आणायचा आहे म्हणून मी अर्ज भरणार नाही असं जगदीश मुळीक यांनी जाहीर केलं.

जगदीश मुळीक यांच्यासोबत आलेले शेकडो कार्यकर्ते नाराज झाले आहेत. जगदीश मुळीक तुम्ही फॉर्म भरा आणि तुमच्या सोबत आहोत अशी जोरदार घोषणाबाजी यावेळी करण्यात आली आहे. क्षेत्रीय कार्यालयाच्या बाहेर कार्यकर्त्यांची जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

# बावनकुळेंच्या ताफ्यातील वाहने परस्परांवर आदळली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९नागपूर**

उमेदवारी अर्ज भरण्याचा मंगळवार हा शेवटचा दिवस असल्याने अर्ज भरण्यासाठी सर्वांची एकच धावपळ उडाली. प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बानकुळे यांनाही मंगळवारी अर्ज भरायचा होता. प्रदेशाध्यक्ष असल्याने त्यांच्या प्रचार ताफ्यात मोठ्या संख्येने वाहने होती. त्यापैकी पाच वाहने परस्परांवर धडकली.

महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा २९ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस आहे. दुपारी तीन वाजेपर्यंत अर्ज दाखल करण्याची वेळ आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांना त्यांच्या कामठी विधानसभा मतदारसंघात पक्षाने उमेदवारी दिली आहे. ते मंगळवारी अर्ज भरणार असल्याने सकाळपासूनच पक्षाकडून त्याची तयारी सुरू करण्यात आली होती. प्रदेशाध्यक्ष अर्ज भरणार म्हणून मोठे शक्तीप्रदर्शन करण्यासाठी कार्यकर्ते कामाला लागले. गावोगावातून कार्यकर्त्यांना बोलवण्यात आले. खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अर्ज भरण्यासाठी नागपुरात आले आहे. तेथून ते कामठीला जाणार आहे. चंद्रशेखर बावनकुळे यांचा उमेदवारी अर्ज भरण्याकरिता जाणाऱ्या कार्यकर्त्यांच्या ताफ्यातील चार ते पाच गाड्या एकमेकांवर आदळल्या. सावनेर मार्गावरील अंबिका बारजवळ ही घटना घडली. त्यात भाजपचे तीन कार्यकर्ते जखमी झाले.. जखमींना सामाजिक कार्यकर्ते हितेश बनसोड यांच्या मदतीने जिवतोडे हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले आहे.

# 'गल्लीत गोंधळ, दिल्लीत मुजरा'ची पुनरावृत्ती: उमेदवारानं भरली १० हजाराची चिल्लर! मोजता मोजता अधिकाऱ्यांना फुटला घाम



**कोरेगावची राजकीय करमणूक ठरते चर्चेची**

साताऱ्यातील कोरेगाव मतदार संघ हा कायमच चर्चेत असतो. काँग्रेसचे दिवंगत नेते शंकरराव जगताप, डॉ. शालिनीताई पाटील यांनी या मतदार संघाचं यापूर्वी नेतृत्व केलंय. कोरेगाव तालुक्यातील जिल्हा परिषद सदस्याला देखील आमदारकीची स्वप्नं पडतात.

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९सातारा**

सातारा जिल्ह्यातील कोरेगाव विधानसभा मतदार संघात सोमवारी शशिकांत शिंदे नावाच्या अपक्ष उमेदवारानं विधानसभा निवडणूक २०२४ साठी उमेदवारी अर्ज दाखल केला. अनामत रक्कमेपोटी त्यांनी आणलेली १० हजाराची चिल्लर मोजता मोजता अधिकाऱ्यांना घाम फुटला. यामुळे 'गल्लीत गोंधळ, दिल्लीत मुजरा', या मराठी चित्रपटातील प्रसंगाची पुनरावृत्तीच पाहायला मिळाली. या घटनेची सातारा जिल्ह्यात मोठी चर्चा सध्या सुरू आहे.

अपक्ष उमेदवारानं आणली १० हजाराची चिल्लर : कोरेगाव विधानसभा मतदार संघात शिवसेना उबाठा पक्षाचे विद्यमान आमदार महेश शिंदे आणि राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार शशिकांत शिंदे यांच्यात मुख्य लढत होणार आहे. मात्र, सोमवारी शशिकांत शिंदे नावाच्या एका अपक्ष उमेदवारानं आपला अर्ज दाखल करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली. तसेच अनामत रक्कम भरण्यासाठी चक्क १० हजाराची चिल्लर आणल्यानं चिल्लर मोजताना अधिकारी घामाघूम झाले. अधिकाऱ्याची घामाघूम अवस्था पाहून नागरिकांमध्ये मात्र चांगलीच चर्चा रंगली.

# या वयात इतके खोटं बोलायचे नसतं; शरद पवारांच्या आरोपांना फडणवीसांचे प्रत्युत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ मुंबई**

लोकसभेप्रमाणेच बारामती विधानसभेच्या निवडणुकीकडेही महाराष्ट्राचे लक्ष लागलं आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार आणि त्यांचे पुतणे युगेंद्र पवार यांच्यात ही लढत होणार आहे. दोन्ही उमेदवारांनी निवडणुकीचे अर्ज दाखल केले आहेत. त्यानंतर आज युगेंद्र पवार यांच्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी सभा घेतली. यावेळी शरद पवार यांनी पंतप्रधान मोदींपासून महाराष्ट्रातल्या उद्योगांपर्यंत भाष्य केलं. यावेळी अजित पवार यांचाही शरद पवारांनी खरपूस समाचार घेतला. शरद पवार यांनी केलेल्या टीकेला आता उपमुख्यमंत्री देवेद्र फडणवीस यांनी प्रत्युत्तर दिलं आहे. महाविकास आघाडी गुजरातची ब्रँड ॲम्बॅसिडर असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर आज बारामतीमध्ये शरद पवार यांनी युगेंद्र पवार यांच्यासाठी प्रचारसभा घेतली. यावेळी शरद पवार यांनी



देशभरातील बेकारी आणि उद्योग-धंद्यांबाबत भाष्य केले. तसेच महाराष्ट्रातून परराज्यात गेलेल्या उद्योगांवरुन शरद पवार यांनी महायुती आणि केंद्र सरकारवर टीकास्त्र डागलं. इथून पुढे ज्या लोकांनी नोकऱ्या बाहेर नेल्या त्यांना साथ दिली जाणार नाही, असंही शरद पवार यांनी म्हटलं. शरद पवार यांनी केलेल्या आरोपांवर देवेंद्र फडणवीस यांनी ट्वीटच्या माध्यमातून प्रतिक्रिया दिली.या वयात इतके खोटे बोलायचे नसते. काल जयराम रमेशजी आणि आज शरद पवारजी, ज्यांच्या काळात गुंतवणूक आणण्यात कधी गुजरात तर कधी कर्नाटक नंबर एकवर होते, ते आज महाराष्ट्र क्रमांक एकवर आल्यावर जरा अधिकच अस्वस्थ झालेत. तरी सुद्धा खोटा नेरेटिव्ह सेट होण्यापूर्वी वास्तव महाराष्ट्राला पुन्हा एकदा सांगावे लागेल, असं म्हणत फडणवीस यांनी टाटा एअरब, फॉक्सकॉन या प्रकल्पाची उदाहरणं दिली आहेत. टाटा एअरबस, फॉक्सकॉन असो किंवा अन्य प्रकल्प सातत्याने खोटे बोलून मविआच्या नेत्यांनी दिशाभूल केली. सॅफ्रनच्या बाबतीत तर कहरच केला होता. कंपनीने २ मार्च २०२१ लाच हैदराबादेत त्यांच्या प्रकल्पाचे उदघाटन केले होते. पण, आमचे सरकार आल्यावर तोही प्रकल्प गुजरातला गेल्याची आरोळी उठवली गेली. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी या सर्वांबाबत मी स्वत: मंत्रालयात एक पत्रपरिषद घेतली होती. सर्व मुद्यांचे सविस्तर सादरीकरण केले होते. पण, पुन्हा पुन्हा खोटे बोलून तोच तो अजेंडा सांगितला जात आहे. स्वत:जवळ काही सांगण्यासारखे नसले तर खोट्याशिवाय कशाचाच सहारा नसतो, हेच सत्य आहे. असू द्या. एकीकडे ५२ टक्के परकीय गुंतवणूक राज्यात आणणारे सरकार आहे आणि दुसरीकडे गुजरातच्या ब्रँड ॲम्बॅसिडरच्या भूमिकेतील कर्तव्यशून्य महाविकास आघाडी. राज्यातील जनताच याचा निकाल २० नोव्हेंबरला लावेल, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

## संपादकीय ......

# महागाईचा अंधार, शेतकरी बेजार

*दीपोत्सवाची सुरुवात आणि विधानसभा निवडणुकांच्या रणधुमाळीमुळे महाराष्ट्राच्या अवकाशात राजकीय टीका टिप्पणीचे बार उडवले जात आहेत. फटाके वाजवताना जशी पर्यावरण आणि निसर्गाची काळजी घेतली जाते, तसेच आगीमुळे दुर्घटना होणार नाही, याचीही काळजी घेतली जाते, तशीच काळजी लोकशाहीच्या निवडणुकीच्या उत्सवातही घ्यायला हवी. वक्तव्यांच्या बाणांमुळे समाजमन, कायदा आणि सुव्यवस्था तसेच राज्याची घडी विस्कटली जाऊन कोणतीही राजकीय दुर्घटना घडणार नाही.याची काळजी निवडणूक आयोगासोबतच सामान्य नागरिक आणि राजकीय मंडळींनीही घ्यायला हवी. निवडणुकीच्या उत्सवातही आज उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी बंडखोरी, नाराजी, मनधरणी ही अखेरच्या टप्पात आली आहे. अशा परिस्थितीत राजकीय शह-काटशहाच्या खेळी खेळल्या जात असताना सत्ताधार्यांनी आणि विरोधक तसेच सर्वच राजकीय मंडळींचे शेतकरी आणि सामान्यांच्या प्रश्नांकडे दुर्लक्ष झाले आहे. राज्यातील शेतकरी मेटाकुटीला आला आहे. परतीच्या पावसाने महाराष्ट्रात केलेले नुकसान मोठे आहे.सोयाबीन, भात शेती पुरती धोक्यात आली आहे. मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र, विदर्भात परतीच्या पावसाने मोठे नुकसान केले आहे. अशा परिस्थितीत शेतकर्यांची दिवाळी अंधारात जाणार आहे. त्यातच यंदा सामान्यांच्या दिवाळी प्रकाशोत्सवाला महागाईच्या अंधाराशी लढावे लागणार आहे. वर्ष सरण्याला दोन महिन्यांचा अवकाश असताना हे वर्ष निवडणुकांच्या धामधुमीचे वर्ष म्हणूनच लक्षात राहाणार आहे. त्यात सामान्य जनतेच्या पदरात काय पडले, हा प्रश्न दुय्यम ठरला आहे.*

*लसूण, कोथिंबीर आणि कांद्याने डोळ्यात पाणी आणले असतानाच परतीच्या पावसाने येत्या काळात महागाईचे नवनवे विक्रम प्रस्थापित केले आहेत. या वर्षात महागाईने सामान्यांचे कंबरडे पुरते मोडून टाकले असून या दिवाळीतही ही विवंचना कायम आहे. यंदाची दिवाळी मागील वर्षाच्या तुलनेत २० टक्क्यांनी महाग ठरली आहे. 'दिवाळी सण मोठा नाही आनंदाला तोटा' असे तोंडी म्हटले जात असले तरी सामान्यांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे.परतीच्या पावसाच्या तडाख्याने यात भरच पडणार असल्याने यंदाचा दिवाळी फराळ आणि खाद्यपदार्थ, धान्य परवडेनासे झाले आहे. खाद्यतेलांच्या वस्तूसह इतर वस्तूंमध्येही दरवाढ झाली आहे. खाद्यतेल, साखर, सुकामेवा, डाळीच्या किमती २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्यामुळे तयार फराळाच्या किमतीही जवळपास २० ते २५ टक्क्यांनी वाढल्या आहेत. त्यामुळे सामान्यांनी दिवाळी खरेदीत आखडता हात घेतला आहे. चणाडाळ, बेसन, तांदळाचे पीठ, रवा, साखर, पिठीसाखर, साजूक तूप, खाद्यतेल, भाजणी, सुके खोबरे, सुकामेवा जिन्नस खरेदीत यंदा निरुत्साह आहे.या सर्वच जिन्नसांच्या किमती वाढल्या आहेत. काजूचे दरही दोनशे ते अडीचशे रुपये प्रतिकिलोने वाढले आहेत. यात केंद्र सरकारने भर घातली आहे. आयात शुल्क वाढल्यामुळे सोयाबीन तेल सामान्यांना परवडेनासे झाले आहे. दिवाळीत या खाद्यतेलाची मागणी मोठी असते. केंद्र सरकारच्या धोरणामुळे यंदा गोरगरीबांच्या दिवाळीत महागाईचा अंधार झाला आहे. खाद्यतेलाचे दर २५ ते ३० रुपये लिटरमागे वाढले आहेत.*

*दुसरीकडे रांगोळी, कंदील, पणत्यांचा कच्चा मालही महागल्यामुळे त्यांच्या किमतीही वाढल्या आहेत. परतीच्या पावसाने शेतकर्यांच्या डोळ्यात पाणी आणले आहे. अशा परिस्थितीत शेती उत्पादनाची आवक कमी होणार आहे. त्यामुळे येत्या काळात महागाईत भरच पडणार आहे. अशा वेळी दिवाळी साजरी करण्यासाठी शेतकर्यांना दिलासा देण्याची गरज आहे, परंतु निवडणुकांच्या वातावरणात सत्ताधारी आणि विरोधकांचा वेळही सत्तेच्या रणनीती, कुरघोडीच्या राजकारणात जात आहे. त्यामुळे राज्यातील महागाईकडे पाहण्यासाठी आणि त्यावर ठोस उपाय करण्यासाठी राजकारणाला वेळच नसल्याचे चित्र आहे.*

*परतीच्या पावसाचा फटका कोबी, फ्लॉवर आणि बीट या पिकांना बसला आहे. यंदा भाजीपाल्याला चांगला बाजारभाव मिळण्याची आशा शेतकर्यांना होती. मात्र ऐन वेळी हातातोंडाशी आलेले पीक पाण्यात भिजून कुजून पडत आहे. तर सत्ताधारी आणि विरोधकही उमेदवारी मिळवण्यात व्यग्र असल्याने शेतकर्यांना वाली उरलेला नाही. निवडणुका होईपर्यंत आणि नवे सरकार स्थिरस्थावर होईपर्यंत हे वर्ष निघून जाणार आहे. राज्यातील शेतकरी अडचणीत आल्यास त्याचा तातडीचा विपरित परिणाम सामान्यांच्या जगण्यावर होत असतो. सत्तेसाठी कुरघोडीच्या राजकारणात गुंतलेल्यांनी यातून थोडा वेळ काढून सामान्य जनतेला आणि शेतकर्यांनाही महागाईच्या दुष्टचक्रातून दिलासा देण्यासाठी आपली शक्ती खर्च करावी, ती राज्यात होणार्या विधानसभेच्या निवडणुकीच्या निमित्ताने शक्तिप्रदर्शन करण्यात वाया घालवू नये.*

# चैतन्याचा उत्सव दीपावलीचे दिवस आणि मुहूर्त जाणून घ्या...

**दि.२९ विदर्भ प्रजासत्ताक**

दीपावली हा प्रकाशाचा, चैतन्याचा उत्सव आहे. दीपोत्सव सोमवार २८ ऑक्टोबर रोजी गोवत्स द्वादशीच्या दिवशी सुरू होऊन रविवार ३ नोव्हेंबर रोजी भाऊबीज सणाने समाप्त होतो. दीपावलीचा सण साजरा करताना पर्यावरणाचे भान आपण ठेवूया. दीपावली सणामधील प्रत्येक दिवसाची माहिती आणि मुहूर्त आपण जाणून घेऊया, खगोल अभ्यासक आणि पंचांगकर्ते दा. कृ. सोमण यांच्याकडून...



**सोमवार, २८ ऑक्टोबर :**

प्रदोषकाली आश्विन कृष्ण द्वादशी असल्याने या दिवशी गोवत्स द्वादशी, वसुबारस साजरी करावयाची आहे. या दिवशी सूर्यास्तानंतर गाय आणि वासरू यांची पूजा करून गोड पदार्थाचा नैवेद्य खायला द्यायचा आहे. भारतीय संस्कृती ही शेतीप्रधान संस्कृती असल्याने आपण दीपावलीचा आनंदोत्सव साजरा करण्याअगोदर गाय- वासराची पूजा करून त्यांच्याविषयी आदर प्रकट करावयाचा आहे.

**मंगळवार, २९ ऑक्टोबर :**

या दिवशी धनत्रयोदशी आहे. याच दिवशी धन्वंतरी पूजन करावयाचे आहे. या दिवशी गरिबांना दीपदान, वस्त्रदान आणि अन्नदान करावयाचे आहे. गरिबांना दीपावलीचा सण आनंदाने साजरा करता यावा हा यामागचा उद्देश आहे. या दिवशी सकाळी ९.३१ ते १०.५७ चल, सकाळी १०.५८ ते १२.२३ लाभ, १२.२४ ते १.४९ अमृत किंवा ३.१५ ते सायं. ४.४१ शुभ चौघडीमध्ये व्यापारी हिशोबाच्या वह्या आणाव्यात.

**बुधवार, ३० ऑक्टोबर :**

**दीपावलीचा कोणताही सण नाही.**

**गुरुवार, ३१ ऑक्टोबर :**

चंद्रोदयाच्यावेळी आश्विन कृष्ण चतुर्दशी असल्याने याच दिवशी नरकचतुर्दशीचा सण साजरा करावयाचा आहे. या दिवशी चंद्रोदय पहाटे ५.२८ वाजता आहे, सूर्योदय सकाळी ६.४० वाजता आहे. या दिवशी चंद्रोदयापासून सूर्योदयापर्यंत अभ्यंगस्नान करण्यास सांगितले आहे. सुगंधी तेलाने, उटणे लावून मसाज करावा. नंतर उष्णोदक पाण्याने स्नान करावे. याला अभ्यंगस्नान म्हणतात. अभ्यंगस्नान केल्याने स्नायू बळकट होतात. त्वचा कांतिमान होते.

**शुक्रवार, १ नोव्हेंबर :**

प्रदोषकाली आश्विन अमावास्या असल्याने या दिवशी सायं. ६.०४ ते रात्री ८.३५ या काळात लक्ष्मी कुबेर पूजन करावयाचे आहे. या दिवशी अभ्यंगस्नान आणि अलक्ष्मी निस्सारण करायचे आहे. झाडूची पूजाही करावयाची आहे. याच दिवशी श्री महावीर निर्वाण दिवस आहे.

**शनिवार, २ नोव्हेंबर :**

कार्तिक शुक्ल प्रतिपदा , बलिप्रतिपदा, दिवाळी पाडवा सण आहे. हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक दिवस आहे. या दिवशी मौल्यवान वस्तूची खरेदी करतात. तसेच शुभ कार्याचा प्रारंभ करतात. या दिवशी पत्नी पतीला ओवाळते आणि पती पत्नीला भेटवस्तू देतो. या दिवशी विक्रम संवत् २०८१ अनलनाम संवत्सराचा प्रारंभ होत आहे. याच दिवशी महावीर जैन संवत् २५५१ चा प्रारंभ होत आहे. याच दिवशी अन्नकूट आणि गोवर्धन पूजा करावयाची आहे. या दिवशी सकाळी ८.०६ ते ९.३१ शुभ, दुपारी १२.३१ ते दुपारी १.४६ चल, दुपारी १.४७ ते ३.११ लाभ किंवा दुपारी ३.१२ ते ४.३६ अमृत चौघडीमध्ये वही पूजन आणि वही लेखन करावयास उत्तम मुहूर्त आहे.

**रविवार, ३ नोव्हेंबर :**

या दिवशी भाऊबीज सण आहे. बंधू- भगिनीचे प्रेम जिव्हाळा वृद्धिंगत करणारा हा सण असतो. या दिवशी भाऊ बहिणीच्या घरी जातो. बहीण त्याला ओवाळते, भाऊ तिला भेटवस्तू देतो.




## मांड्या खूप जाड दिसतात- चालताना घासल्या जातात? ३ योगासनं करा, मांड्यांची चरबी होईल कमी

दि.२९विदर्भ प्रजासत्ताक ३ लठ्ठपणा आपल्या शरीरासाठी नुकसानकारक ठरतो. चुकीची लाईफस्टाईल आणि फिजिकल एक्टिव्हीटीजच्या अभावामुळे शरीराच्या खालच्या भागाचे फॅट वाढत जाते. मांड्यांची चरबी एकदा वाढली तर ते कमी करणं कठीण होतं पण रोजच्या जीवनात या संबंधित अधिक समस्या उद्भवू लागतात.ज्यामुळे जीन्स आणि कोणतेही वेस्टर्न कपडे सूट होत नाहीत. वजन वाढलं की ते कमी करणंही खूप महत्वाचे असते. मांड्यांची चरबी कमी करण्यासाठी तुम्ही काही योगासनं करून मेंटेन शरीर मिळवू शकता. या योगासनांमुळे काही दिवसांतच तुमच्या मांड्यांचे पूर्ण फॅट कमी होईल.



उष्ट्रासन केल्यानं तुम्ही लठ्ठपणापासून वाचू शकता. हे मांड्यांचे फॅट कमी करण्यासाठी उत्तम ठरते. हे आसन करण्यासाठी तुम्हाला वज्रासनात आधी बसावं लागेल त्यानंतर गुडघ्यांवर उभं राहून पायांच्या पंजावर जोर देऊन नंतर टाचांना स्पर्श करण्याचा प्रयत्न करा. या मुद्रेत राहून ५ ते ६ वेळा श्वास घ्या त्यानंतर आपल्या आधीच्या मुद्रेत परत या.

नटराजासन

नटराजासन केल्यानं तुमच्या मांड्यांची चरबी कमी होऊ शकते. हे आसन करण्यासाठी सगळ्यात आधी सरळ मुद्रेत उभे राहा. त्यानंतर पाय मागच्या बाजूनं खेचा त्यानंतर हातानं अंगठ्याला स्पर्श करण्याचा प्रयत्न करा. त्यानंतर या मुद्रेत १ मिनिटं राहा त्यानंतर पुढच्या बाजूनं वाकण्याचा प्रयत्न करा. काही सेकंद या मुद्रेत राहिल्यानंतर सामान्य स्थितीत या.

नौकासन

नौकासन योग्य पद्धतीनं केल्यास तुमच्या मांड्याचे स्नायू मजबूत होतात. याशिवाय मांड्या, पोट यांवर जमा झालेलं एक्स्ट्रा फॅट कमी होतं. हा उपाय करण्यासाठी सगळ्यात आधी सरळ झोपा त्यानंतर हळू हळू वर उठा. नंतर दोन्ही हातांना पायांनी वर उचलून या अवस्थेत काहीवेळ राहा नंतर हळूहळू आधीच्या स्थितीत या. ही योगासनं केल्यानं मांड्यांचे फॅट कमी होईल. याव्यतिरिक्त तुम्ही आजारांपासूनही दूर राहाल.

# परतीचा पाऊस पडल्यानंतर सुप्तावस्थेतील गोगलगायी बाहेर पडता आहेत कसे कराल उपाययोजना वाचा सविस्तर

दि.२९विदर्भ प्रजासत्ताक

या वर्षी मराठवाड्यातील बऱ्याच भागात परतीचा पाऊस पडल्यानंतर सुप्तावस्थेतील गोगलगायी बाहेर पडताना आढळून येत आहेत, त्यामुळे फळबाग, कापूस यासारख्या पिकामध्ये गोगलगायींचा प्रादुर्भाव वाढून मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते.

कृषी विशेष

त्यामुळे शेतकऱ्यांनी या गोगलगायींना वेळीच लक्ष देऊन पुढील प्रमाणे सामुहिक रीत्या एकात्मिक उपाययोजना करणे गरजेचे आहे जेणेकरून पिकांचे होणारे नुकसान टाळता येईल.

शंखी गोगलगायीचे एकात्मिक व्यवस्थापन

सायंकाळी किंवा सूर्योदयापूर्वी शेतातील गोगलगायी गोळा करून साबणाच्या अथवा मिठाच्या पाण्यात बुडवून माराव्यात किंवा शेतातून मोठ्या शंखी गोगलगायी जमा करून प्लास्टिकच्या पोत्यात भरून त्यात कोरडे मीठ अथवा चुना टाकून त्या पोत्याचे तोंड उघडे न ठेवता घट्ट बंद करावे, जेणेकरून त्यामधील गोगलगायी पोत्यातून बाहेर न जाता मिठाच्या किंवा चुन्याच्या संपर्कात येऊन आत मध्येच मरून जातील.

गोगलगायी जमा करताना अथवा हाताळणी करताना उघड्या हाताने न करता हातमोजे व तोंडावर मास्क घालूनच करणे गरजेचे आहे.

शेतामध्ये किंवा बागेमध्ये ७ ते ८ मीटर अंतरावर विविध ठिकाणी वाळलेल्या गवताचे किंवा भाजीपाला पिकाच्या अवशेषाचे ढीग अथवा गोणपाट गुळाच्या पाण्यात ओले करून शेतात ठिकठिकाणी ठेवावेत. गोगलगायी त्या ठिकाणी आश्रयाला जातात. सूर्योदयानंतर त्याखाली गोळा झालेल्या गोगलगायी व त्यांची अंडी गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकून नष्ट करावी.

गोगलगायींना आकर्षित करण्यासाठी शेतात ठिकठिकाणी गोणपाट ओले करून त्यावर पत्ताकोबी अथवा पपई ची पाने बारीक करून ठेवावीत, त्याला आकर्षित होऊन जमा झालेल्या गोगलगायींवर तंबाखूचा अर्क ५ लिटर (२५० ग्रॅम तंबाखू भुकटी ७.५ लिटर पाण्यात उकळून ५ लिटर तयार झालेले द्रावण) + कॉपर सल्फेट म्हणजेच मोरचूद द्रावण ५ लिटर (३०० ग्रॅम कॉपर सल्फेट ५ लिटर पाण्यात) असे एकूण १० लिटर द्रावण फवारावे, त्याच्या संपर्कात आल्याने गोगलगायी मरतात.

लहान शंखीच्या नियंत्रणासाठी १० टक्के मिठाची (१०० ग्रॅम प्रती १ लिटर पाणी) फवारणी फायदेशीर दिसून आली आहे. बोर्डो मिश्रण (१ किलो मोरचूद + १ किलो चुना १०० लिटर पाण्यात), कॉपर सल्फेट (३०० ग्रॅम १० लिटर पाण्यात) किंवा कॉपर ऑक्सिक्लोराईड (२५ ग्रॅम १० लिटर पाण्यात) इत्यादीच्या फवारण्या गोगलगाय नियंत्रणासाठी नोंदणीकृत नाहीत, परंतु गोगलगाय नियंत्रणासाठी किंवा त्यांना परावृत करण्यासाठी फळबागेत काही प्रमाणात परिणामकारक आहेत.




गोगलगायीच्या नियंत्रणासाठी मेटाल्डिहाईड दाणेदार या गोगलगायनाशकाचा वापर करावा. कापसासारख्या पिकामध्ये दाणेदार मेटाल्डिहाईड २ किलो प्रति एकरी या प्रमाणात शेतात पसरून द्यावे.

तर फळबागेमध्ये झाडाखाली दाणेदार मेटाल्डिहाईड प्रति झाड १०० ग्रॅम पसरून टाकावे.

शंखी गोगलगाय प्रामुख्याने पपईची रोपे व झेंडूच्या रोपांकडे आकर्षित होतात. म्हणून मेटाल्डिहाईडच्या गोळ्या पपईच्या पिवळ्या पानांजवळ ठेवतात. त्यामुळे त्या लवकर आकर्षित होऊन मोठ्या प्रमाणात मरतात. मेटाल्डिहाईड चा वापर, जास्त तापमान व कमी आर्द्रता असते अशावेळी जास्त प्रभावी दिसून येतो.

मेटाल्डिहाईड ला पर्याय म्हणून आयर्न फॉस्फेटचा वापर २ किलो प्रती एकर या प्रमाणात अमिष म्हणून करता येतो. आयर्न फॉस्फेटचा वापर आर्द्रता जास्त असते अशावेळीही प्रभावी दिसून येतो. आयर्न फॉस्फेटच्या संपर्कात आल्यास गोगलगायी उपाशी राहून मरतात.

आयर्न फॉस्फेटचा वापर स्पिनोसॅड या कीटकनाशकासोबत (४ मिलि स्पिनोसॅड प्रती २ किलो आयर्न फॉस्फेट) केल्यास जास्ती परिणामकारक होतो. आयर्न फॉस्फेट पाळीव प्राणी व इतर प्राण्यांना सुरक्षित आहे.

जर हे आमिष उपलब्ध न झाल्यास, पुढील प्रकारे आमिष तयार करून बागेमध्ये टाकून घ्यावे.

दहा लिटर पाण्यामध्ये दोन किलो गूळ अधिक २५ ग्रॅम यीस्ट यांचे द्रावण तयार करावे. हे द्रावण ५० किलो गव्हाच्या अथवा भाताच्या कोंड्यात टाकून चांगले मिसळावे. १० ते १२ तास हे मिश्रण आंबविण्यासाठी ठेवावे. त्यानंतर त्यामध्ये थायामिथोक्झाम २५ टक्के ५० ग्रॅम चांगल्या प्रकारे मिसळावे. हे आमिष शेतामध्ये ढिगाच्या स्वरुपात किंवा बांधाच्या कडेने पट्टा स्वरुपात टाकावे.

सदरील आमिषा पासून पाळीव प्राणी, लहान मुलांना दूर ठेवावे. वरील गोगलगायनाशक अथवा अमिषाचा वापर प्लॅस्टिक हातमोजे घालूनच काळजीपूर्वक करावा.

या व्यतिरिक्त अंड्यांच्या टरफालाचा चुरा, कोरडी राख, तांब्याची पट्टी अथवा जाळी, बोरिक पावडर, यीस्ट पावडरचे द्रावण, साखरेचे द्रावण इ. चा वापर गोगलगायी व्यवस्थापनासाठी करता येतो.

अशाप्रकारे शंखी गोगलगायीचा प्रादुर्भाव ज्या भागात मोठ्या प्रमाणात दिसून येत असेल त्या भागातील शेतकऱ्यांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या वरीलप्रमाणे उपाय योजना सुरवातीपासूनच केल्यास गोगलगायीचे नियंत्रण अधिक प्रभावीपणे होते.

# माजी मंत्री यशोमती ठाकूर या सर्वात श्रीमंत उमेदवार

## चारही प्रमुख उमेदवार करोडपती असूनही कर्जबाजारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती-**

विधानसभा निवडणुकीत आतापर्यंत अर्ज दाखल केलेले चार प्रमुख उमेदवार कोट्यधीश असले तरी चारही उमेदवार कर्जबाजारी आहेत. तिवसा मतदारसंघातून काँग्रेसच्या उमेदवार आणि माजी मंत्री एड पाचव्यांदा नशीब आजमावत आहेत. यशोमती ठाकूर या सवीत श्रीमंत आहेत. दुस-या क्रमांकावर असलेल्या दर्यापूर मतदारसंघातून शिंदे शिवसेनेच्या तिकिटावर निवडणूक लढवत असलेले कॅप्टन अभिजित अडसूळ यांच्यावर सर्वाधिक ५ कोटी रुपयांचे कर्ज आहे.

धामणगाव रेल्वे मतदारसंघातून सलग दुस-यांदा निवडणूक लढवणारे भाजपचे उमेदवार प्रताप अडसड आणि माजी जिल्हा परिषद सदस्य आणि अचलपूर मतदारसंघातील भाजपचे गटनेते प्रवीण तायडे हेही करोडपती आहेत. नामनिर्देशनपत्रासोबत सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात या उमेदवारांनी त्यांच्या जंगम आणि जंगम मालमत्तेचा तपशीलही दिला आहे, त्यात त्यांनी वार्षिक उत्पन्नाचा तपशीलही सादर केला आहे, ज्यात एड. यशोमती ठाकूर यांचेवार्षिक उत्पन्न ४१.९० लाख रुपये आहे. अभिजीत अडसूळ यांची संपत्ती ३१.५१ लाख रुपये, प्रताप अडसूळ यांची मालमत्ता २०.३३ लाख रुपये, प्रवीण तायडे यांचे वार्षिक उत्पन्न ६.७८ लाख रुपये आहे.











कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर



# अमरावती जिल्ह्यात सोमवारी ७७ उमेदवारांचे नामांकन अर्ज दाखल

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२९अमरावती,** विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज ७७ उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. धामणगाव रेल्वे - ९, बडनेरा - १३, अमरावती - १०, तिवसा - १२, दर्यापूर - ११, मेळघाट - ७, अचलपूर - ८, मोर्शी - ७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

३६ धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात विजय शामराव शेंडे - अपक्ष, मनिष वीरेंद्र जगताप, हर्षवर्धन बळीराम खोब्रागडे - बहुजन महा पार्टी, योगेंद्र एकनाथ पाटील - बहुजन समाज पार्टी, अभिलाषा चंद्रशेखर गजभिये - अपक्ष, विरेंद्र वाल्मिक जगताप - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, अमोल प्रभाकर बिरे - अपक्ष, संदिप कृष्णराव वाट - अपक्ष, सुभाष रामाजी भोयर - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

३७ बडनेरा विधानसभा मतदारसंघातून मुन्ना नारायणसिंग राठोड - अपक्ष, सुरज नारायण घरडे - अपक्ष, श्रीकांत बाबुराव फुलसावंदे - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए), प्रशांत पंजाब जाधव - अपक्ष, उत्तम किसनराव तिरपुडे - पीपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक), नितीन बाबाराव कदम - अपक्ष, राहुल प्रकाश श्रृंगारे - अपक्ष, सुरेश पुंडलिक मेश्राम - अपक्ष, मंजुषा प्रशांत जाधव - अपक्ष, गिरीश हरिदास बारबुद्धे - अपक्ष, संजय देवरावजी महाजन - राष्ट्रीय समाज पक्ष, प्रीती संजय बंड - अपक्ष, सुनंदा जयराम अभ्यंकर - अपक्ष यांनी नामांकन अर्ज सादर केले.

३८ अमरावती विधानसभा मतदारसंघात सैय्यद अबरार सैय्यद मजीद - प्रहर जनशक्ती पार्टी, जगदिश मोतीलाल गुप्ता - अपक्ष, पुरूषोत्तम किसन बागडी - अपक्ष, सुलताना परवीन मोहम्मद जाकीर - अपक्ष, मेराजुनिस्सा अब्दुल शकील - रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (ए), शेख युसुफ - अपक्ष, बबल हरिभाऊ रडके - अपक्ष, पाटील पप्पु उर्फ मंगेश मधुकरराव - महाराष्ट्र नवनिर्माण सेना, विजय माणिकराव ढाकुलकर - अपक्ष, अविनाश हरिशचंद्र धनवटे - पिपल्स पार्टी ऑफ इंडिया (डेमोक्रॅटीक) यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

३९ तिवसा विधानसभा मतदारसंघात विनोद किसन भालेराव - अपक्ष, शुभम विजय गजभिये - भारतीय युवा जन एकता पार्टी, दिनकर रामदास सुंदरकर - अपक्ष, राजीव बक्षी जामनेरकर - विकास इंडिया पार्टी, शिल्पा नरेंद्र कठाणे - जनवादी पार्टी, प्रवीण मारोतराव देशमुख - अपक्ष, युसुफ शा बिस्मिल्ला शा - अपक्ष, राजेश श्रीरामजी वानखडे - भारतीय जनता पक्ष, सुयश पांडुरंग श्रीखंडे - अपक्ष, अर्जुन सुखदेवराव युवनाते - अपक्ष, वासुदेव विठ्ठलराव कळसकर - अपक्ष, सुरज निरंजन लांडगे - आंबेडकरवादी रिपब्लिकन पार्टी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

४० दर्यापूर विधानसभा मतदारसंघात बबन महादेव विल्हेकर - अपक्ष, रमेश झिंगुजी अंभोरे - अपक्ष, राक्षसकर निलेश गजानन - अपक्ष, मनोहर अमृतराव चौथमल - अपक्ष, गजानन मोतीराम लवटे - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), नागोराव वामन हंबर्डे - बहुजन समाज पार्टी, मनोहर कृष्णाजी कुऱ्हाडे - अपक्ष, रमेश गणपतराव बुंदिले - राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टी, श्रीराम श्रावण नेहर - अपक्ष, कैलास उत्तमराव मोरे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ), रविकिरण देविदास तेलगोटे - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.



४१ मेळघाट विधानसभा मतदारसंघात राजेश किसन दहीकर - अपक्ष, विपीन छोगालाल पटेल - अपक्ष, केवलराम तुळशीराम काळे - भारतीय जनता पार्टी, रामचरण माणिकराव चव्हाण - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, हेमंत नंदा चिमोटे - भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राजकुमार दयाराम पटेल - प्रहर जनशक्ती पार्टी, प्रवीण रामू मावसकर - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

४२ अचलपूर विधानसभा मतदारसंघात ठाकूर प्रमोदसिंह जियालाल गड्रेल - अपक्ष, तमीज शाहा उमर शाहा - अपक्ष, गिरीधर नथ्थूजी रौराळे - अपक्ष, अक्षरा रूपेश लहाने - अपक्ष, रवि गुणवंत वानखडे - बहुजन समाज पार्टी, गौरव ओमप्रकाश किटुकले - अपक्ष, बच्चू कडू - प्रहर जनशक्ती पक्ष, रूकसाना सैय्यद निसार - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

४३ मोर्शी विधानसभा मतदारसंघात उमेश प्रल्हादराव शहाणे - अपक्ष, देवेंद्र महादेवराव भुयार - नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी, प्रमोद सुभाषराव कडू - अपक्ष, सुशिल सुरेशराव बेले - आझाद समाज पार्टी (कांशीराम), गिरीश रंगराव कराळे - नॅशनॅलिस्ट काँग्रेस पार्टी (श. प.), कमलनारायण जानराव उईके - बहुजन समाज पार्टी, महेंद्र उत्तमराव भातकुले - अपक्ष, यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# महायुतचा रवी राणा यांना अधिकृतपणे पाठिंबा केला जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९ अमरावती**- अमरावती. भाजपच्या कोट्यातून महायुतीचे घटक पक्ष युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा यांना बडनेरा विधानसभा मतदारसंघातून महायुतीचे अधिकृत उमेदवार म्हणून जाहीर करण्यात आले आहे. भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सोमवारी सायंकाळी जाहीर केले की, रवी राणा यांचा युवा स्वाभिमान पक्ष महायुतीचा घटक पक्ष असून महायुतीने बडनेरा विधानसभा मतदारसंघ रवी राणा यांच्या करिता भाजपच्या कोट्यातून सोडला आहे.



याप्रकारे बडनेरा विधानसभा मतदारसंघात युवा स्वाभिमान पक्षाचे उमेदवार रवी राणा हे महायुतीचे अधिकृत उमेदवार आहेत.भाजपचे प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी बडनेरा विधानसभा मतदारसंघात पक्षातून बंडखोरी केल्यास पक्षातून थेट हकालपट्टीची तंबी देखील दिली आहे. भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले, पिरिपा कवाडे आणि लहूजी शक्ती सेना महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे अधिकृत उमेदवार रवी राणा हे पाणा निवडणूक चिन्हावर पुन्हा एकदा जनतेच्या सेवेसाठी सर्व मातृ शक्ती-पितृ शक्तीच्या आशीर्वादाने २९ आक्टोबर २०२४ रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. त्या आधी सोमवारी २८ आक्टोबर रोजी महायुतीने रवी राणा यांना अधिकृतपणे महायुतीचे उमेदवार जाहीर करुन सक्रिय पाठिंबा दिल्याने बडनेरा विधानसभा मतदारसंघात उत्साहाचे वातावरण आहे. आज २९ आक्टोबर रोजी रवी राणा यांच्या नामांकन रॅलीत भाजप,शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, रिपाई आठवले, पिरिपा कवाडे आणि लहूजी शक्ती सेना महायुतीचे युवा स्वाभिमान पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महायुतीच्या उमेदवार सौ. सुलभाताई खोडके यांना निवडून आणण्याचा भाजपचा निर्धार




## प्रविण पोटे पाटील यांच्या मार्गदर्शनात भाजपा निर्धार मेळावा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती**- अमरावती विधानसभा मतदार संघाच्या निवडणुकीत महायुती कडून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (अजित पवार) पक्षाच्या वतीने विद्यमान आमदार सौ. सुलभाताई संजय खोडके यांना उमेदवारी देण्यात आली आहे. महायुतीची जागा राष्ट्रवादीला सुटताच अमरावतीमधून महायुतीच्या उमेदवाराला निवडून आणण्याचा संकल्प शहर भाजपाच्या वतीने करण्यात आला असून भाजपा शहराध्यक्ष तथा आ.प्रवीण पोटे यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात स्थानिक भाजपाचे पदाधिकारी व कार्यकर्ते कामाला लागले आहेत.

अशातच अमरावती विधानसभा निवडणुकीच्या नियोजन संदर्भात भारतीय जनता पार्टीचा निर्धार मेळावा आज दिनांक २८ ऑक्टोबर २०२४ रोजी हॉटेल ग्रँड मेहफिल,च्या रूबी सभागृह येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. मेळाव्याच्या अध्यक्षस्थानी भाजपा शहराध्यक्ष तथा आ.प्रवीण पोटे तसेच प्रमुख अतिथी म्हूून गुजरातचे कॅबिनेट मंत्री ऋषिकेश पटेल , मध्यप्रदेश भाजपाचे संघटन महामंत्री हितानंद शर्मा, राज्यमंत्री दर्जा राजाभैयाजी ,महायुतीच्या उमेदवार सौ.सुलभाताई खोडके, महायुती समन्वय समितीचे सदस्य संजय खोडके, जयंत डेहणकर, नितीन धांडे, किरणताई महल्ले, रवींद्र खांडेकर, चेतन पवार, विवेक कलोती, सतीश करेसीया, अनितातार्ई राज, गंगाताई खारकर, सुरेखा लुंगारे ,कौशिक अग्रवाल आदी मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भाजपा कार्यकर्त्यांच्या वतीने अमरावतीमधून महायुतीच्या उमेदवाराला विजयी करण्याबाबतचा निर्धार करण्यात आला. अमरावतीची महायुतीची जागा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीला सुटली असता भाजपाने सर्वप्रथम पाठीशी उभे राहून साथ व विश्वास दर्शविला, माझ्या जनआशीर्वाद यात्रेतही भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते सोबत असून त्यांनी अनेक बैठका घेऊन अमरावतीतून राष्ट्रवादीला साथ दर्शविली. याबाबद्दल आ.सौ. सुलभाताई खोडके यांनी भाजपा व भाजपाप्रणित सर्व मोर्चा चे अभिनंदन केले. तसेच महायुती सरकारच्या काळात कार्यान्वित जनतेच्या हिताच्या योजना आपण घरा-घरा पर्यंत पोहोचविण्यासाठी कटीबद्द असल्याचा विश्वास सुद्धा महायुतीच्या उमेदवार सौ. सुलभाताई खोडके यांनी व्यक्त केला.

तर भाजपा शहराध्यक्ष आ. प्रवीण पोटे यांनी उपस्थितांना संबोधित करतांना महायुतीच्या उमेदवार सौ. सुलभाताई खोडके यांच्या मंगळवार २९ ऑक्टोबर रोजी नामांकन रॅली मध्ये सर्वांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. यावेळी गुजरातचे कॅबिनेट मंत्री ऋषिकेश पटेल , मध्यप्रदेश भाजपाचे संघटन महामंत्री हितानंद शर्मा यांनी सुद्धा आपल्या संबोधनातून कार्यकर्त्यांमध्ये जोश व उत्साह भरला. विधानसभेची निवडणूक ही गतिशील,प्रगत व विकसित महाराष्ट्र घडविणारी असून जनतेच्या उज्वल भविष्याला दिशा देणारी आहे. त्यामुळे महायुती सरकारला साथ देण्यासाठी मोठ्या एकजुटीने कामाला लागून कोणत्याही परिस्थितीत अमरावतीतून महायुतीच्या सौ. सुलभाताई खोडके यांना प्रचंड बहुमताने निवडून आला असे आवाहन त्यांनी केले. यावेळी भाजपाचे प्रदेश, शहर , महिला मोर्चा, बूथ कमिटीचे आदींचे पदाधिकारी व सहकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावधान! फटाक्यांमुळे अंधत्वाचा धोका अधिक, दरवर्षी पाच हजारांवर लोकांची दृष्टी जाते

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९अमरावती** - दिवाळी म्हणजे अमावस्येच्या काळोखाला भेदणारा प्रकाशाचा सण. रोषणाईचा, आनंदाचा, उत्साहाचा सण. पण कधी कधी अति उत्साहात सुरक्षेकडे जरा दुर्लक्ष होते. विशेषत: फटाक्यांमुळे अंधत्वाची जोखीम निर्माण होते. देशात दरवर्षी सुमारे पाच हजारांवर लोकांची दृष्टी जाते. विविध फटाक्यांमुळे डोळ्यांना इजा होण्याचा धोका अधिक वाढत असल्याचे तज्ज्ञाचे म्हणणे आहे.



फटाक्यांमुळे अंधत्वाचे प्रमाण जागतिक पातळीवर पाच लाखांवर आहे. फटाका फुटल्यानंतर निघणारा धूर डोळ्यांना व फुफ्फुसांना, तसेच त्वचेला अपायकारक असतो. बंगळुरू येथील शासकीय मिंटो ऑप्थल्मोलॉजी हॉस्पिटलमधील रुग्णांच्या नोंदीनुसार, २००८ ते २०२० या कालावधीत फटाक्यांमुळे डोळ्यांना झालेल्या दुखापतींवरील व रुग्णालयात उपचार करण्यात आले. यात फटाक्यांमुळे डोळ्यांच्या दुखापतींपैकी १६ वर्षांखालील मुलांचा वाटा ४९.३ टक्के आहे.

### असा होईल धोका...

फटाके फुटल्यानंतर दगड, माती वेगाने उडते व डोळ्याला व इतर अवयवांना इजा होऊ शकते. फटाक्यात जळती ठिणगी किंवा घटक गेल्यास डोळा कायमचा निकामी होण्याची शक्यता असते.

# फटाक्यांच्या मोसमात पावसाची आतषबाजी, महाराष्ट्रात पुन्हा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९नागपूर :** पावसाचा मोसमी पावसाने राज्यातून माघार घेतली आहे. पण, अवकाळी पाऊस राज्याची पाठ सोडायला तयार नाही. आताही राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये येत्या २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान हलक्या ते मध्यम स्वरुपाच्या पावसाचा इशारा हवामान खात्याने दिला आहे. हवामान खात्याचे शास्त्रज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी या कालावधीत राज्यातील काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस व विजांचा कडकडाट तसेच ताशी ३० ते ४० किलोमीटर वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता वर्तवली आहे.

राज्यातील अनेक भागात ऑक्टोबरच्या पहिल्या आणि दुसऱ्या आठवड्यात मुसळधार पावसाने हजेरी लावली. या पावसाचा परिणाम काढणीला आलेल्या पिकांवर देखील झाला. दरम्यान, या कालावधीत असह्य उकाड्याचा अनुभव नागरिकांनी घेतला. आता मात्र थंडीची सुरुवात झाली आहे. सायंकाळपासूनच वातावरणात हलका गारवा जाणवत आहे. दिवसाचा उकाडा देखील बऱ्याच प्रमाणात कमी झाला आहे. राज्यात थंडीची चाहूल लागली असतानाच आता ऑक्टोबरच्या अखेरच्या आठवड्यात २९ ते ३१ ऑक्टोबरदरम्यान राज्यातील काही जिल्ह्यात हलका ते मध्यम



स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. यावेळी ताशी ३० ते ४० किलोमीटर प्रति वेगाने वारे वाहतील आणि विजांचा कडकडाट देखील होईल, असाही अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे. दरम्यान, २९ ऑक्टोबरला छत्रपती संभाजीनगर, पुणे, रायगड, सातारा, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नांदेड, हिंगोली, परभणी, जालना या जिल्ह्यांना तर विदर्भातील यवतमाळ, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा या जिल्ह्यात 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. या जिल्ह्यांमध्ये हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. ३० ऑक्टोबरला देखील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, पुणे, सातारा, रत्नागिरी, रायगड, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, सोलापूर, धाराशिव तसेच विदर्भातील यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली या भागात 'येलो अलर्ट' देण्यात आला आहे. ३१ ऑक्टोबरला विदर्भातील यवतमाळ, वर्धा आणि चंद्रपूर या जिल्ह्यात 'येलो अलर्ट' देण्यात आला असून इतर जिल्ह्यात कोणताही अलर्ट देण्यात आलेला नाही.

# भाजप+ १५०; काँग्रेस १०० पार; तर शिंदेसेनेने दिले ८० उमेदवार; भाजपच्या नेत्यांना शिंदेसेनेकडून उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२९मुंबई**- विधानसभा निवडणुकीसाठी भाजपने २५, शिंदेसेनेने १५ तर काँग्रेसने ४ उमेदवारांची यादी सोमवारी जाहीर केली. भाजपने आतापर्यंत १४६ उमेदवार जाहीर करीत ४ जागा मित्रपक्षांसाठी सोडल्या. यासह भाजप आतापर्यंत १५० जागांवर पोहोचला आहे. तर काँग्रेसही १०२ जागांवर पोहोचला आहे. मविआमध्ये काँग्रेस सर्वाधिक जागा लढत असल्याचे यातून स्पष्ट झाले आहे. शिंदेसेनेने आजच्या यादीसह एकूण ८० उमेदवार रिंगणात उतरविले असून त्यात काही भाजप नेत्यांनाही संधी दिली आहे.

भाजपने दादाराव केचे (आर्वी), विकास कुंभारे (मध्य नागपूर), डॉ. संदीप धुर्वे (आर्णी), नामदेव ससाणे (उमरखेड) व सुनील राणे (बोरिवली) यांचे तिकीट कापले. मात्र, हरीश पिंपळे (मूर्तिजापूर), भारती लव्हेकर (वर्सोवा), पराग शाह (घाटकोपर पूर्व), राम सातपुते (माळशिरस) यांना पुन्हा संधी दिली. चंद्रपूरचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार आणि काँग्रेसमधून आलेले माजी आमदार जितेश अंतापूरकर (देगलूर) यांनाही उमेदवारी दिली.

रा. स्व. संघाचे मुख्यालय ज्या मध्य नागपूर मतदारसंघात येते तेथील विद्यमान आमदार विकास कुंभारे यांना उमेदवारी नाकारली. तेथे माजी महापौर



प्रवीण दटके यांना उमेदवारी दिली. भाजपने आतापर्यंत राज्यात १४६ उमेदवार जाहीर केले आहेत. त्यात ९३ विद्यमान आमदारांचा समावेश आहे. वसईमधून उमेदवारी मिळालेल्या स्नेहा दुबे या माजी आमदार व श्रमजीवी संघटनेचे नेते विवेक पंडित यांच्या कन्या आहेत.

**फडणवीसांचे दुसरे पीए रिंगणात**- देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांचे पीए राहिलेले अभिमन्यू पवार हे २०१९ मध्ये औसामधून लढले आणि जिंकले होते. आता फडणवीस यांचे सहा महिने पूर्वीपर्यंत पीए असलेले सुमित वानखेडे यांना आर्वीतून (जि.वर्धा) उमेदवारी देण्यात आली आहे. आर्वीमध्ये शरद पवार गटाने वर्धेचे खासदार अमर काळे यांच्या पत्नी मयुरा काळे यांना उमेदवारी दिली आहे.लोकसभेपूर्वी काँग्रेस सोडली, आता 'भाजप'चे उमेदवार : माजी आमदार दिवंगत रावसाहेब अंतापूरकर (काँग्रेस) यांच्या निधनानंतर त्यांचे पुत्र जितेश काँग्रेसकडून पोटनिवडणूक लढले आणि जिंकले होते. लोकसभा निवडणुकीपूर्वी त्यांनी 'भाजप'मध्ये प्रवेश केला. 'भाजप'ने त्यांना देगलूरमध्ये उमेदवारी दिली.

### ...या चार जागा मित्रपक्षांना

भाजपने बडनेराची जागा युवा स्वाभिमानीला, गंगाखेडची जागा राष्ट्रीय समाज पक्षाला, कलिना; मुंबईची जागा रिपब्लिकन पक्षाला, तर शाहुवाडीची जागा जनसुराज्य पार्टीला सोडली आहे. बडनेरामध्ये रवि राणा, गंगाखेडमध्ये रत्नाकर गुट्टे, तर शाहुवाडीत विनय कोरे हे उमेदवार असतील.

**लातूरमध्ये चाकूरकर-देशमुख सामना** : लातूर शहरमध्ये भाजप उमेदवार अर्चना पाटील-चाकूरकर या माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील-चाकूरकर यांच्या सून आहेत. त्यांचा सामना काँग्रेसचे अमित देशमुख यांच्याशी होईल.



## अमरावतीकरांसाठी दिवाळीत एलटीटी-बिलासपूर विशेष ट्रेन

### २९ ला मुंबई जाण्यासाठी, तर ३० ला परतण्यासाठी सुविधा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

प्रवाशांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेता मध्य रेल्वेतर्फे दिवाळीनिमित्त २ अतिरिक्त सेवांसह लोकमान्य टिळक टर्मिनस बिलासपुर –लोकमान्य टिळक टर्मिनस उत्सव विशेष ट्रेनला मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे जे अमरावती, बडनेरावासी या कालावधीत मुंबई मार्गावरील तसेच बिलासपूरपर्यंत असलेल्या मार्गावरील शहरांकडे जाण्यास इच्छुक आहेत, त्यांना तिथवर प्रवास करता येणार आहे.

गाडी क्र. ०८२९४ उत्सव विशेष लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथून बुधवार, ३० ऑक्टोबरला रात्री ११.५० वाजता सुटेल आणि बिलासपूर येथे दुसऱ्या दिवशी रात्री ८.५०

वाजता पोहोचेल. तसेच गाडी क्र. ०८२३९ उत्सव विशेष बिलासपूर येथून मंगळवार, २९ ऑक्टोबरला सकाळी ९.३५ वाजता सुटेल आणि लोकमान्य टिळक टर्मिनस मुंबई येथे दुसऱ्या दिवशी रात्री ८ वाजता पोहोचेल. या मार्गात कल्याण, इगतपुरी, नाशिक रोड, मनमाड, भुसावळ, अकोला, बडनेरा, वर्धा, नागपूर, गोंदिया, दुर्ग आणि रायपूर या स्थानकावर ही गाडी थांबा घेईल. दोन द्वितीय वातानुकूलित, देवेन तृतीय वातानुकूलित, १० शयनयान, दोन गार्ड्स ब्रेक व्हॅनसह ६ द्वितीय श्रेणी असे २२ कोच या गाडीला जोडण्यात आले आहेत.गैरसोय टाळण्यासाठी कृपया वैध तिकिटांसह प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## वसुबारसने दिवाळीची सुरुवात; खरेदीसाठी बाजारात गर्दी:सुकामेवा गिफ्टचे यंदा आकर्षण

### झेंडू आणि इतर फुलांची मोठी आवक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

वसुबारसने दिवाळीची सुरुवात झाली असून, नरकचतुर्थी, लक्ष्मीपूजन, पाडवा, भाऊबीज असा हा आनंदोत्सव द्विगुणित होत जाणार आहे. बाजारपेठेतही दिवाळीचा उत्साह दिसून येत आहे. लक्ष्मीपूजन आणि पाडव्याच्या पार्श्वभूमीवर पारंपरिक पूजा साहित्यासह फटाके, कपडे, मिठाई, गृहोपयोगी वस्तू, इलेक्ट्रॉनिक वस्तू खरेदीसाठी नागरिकांची शहरातील बाजारात लगबग दिसून येत आहे.

दिवाळी पाडवा हा वर्षातील साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जातो. व्यापाऱ्यांसाठी महत्त्वाचा दिवस. या पार्श्वभूमीवर सोमवारी बाजारपेठेत पूजासाहित्य, कीर्द, खतावण्या, रोजमेळ आदी साहित्यांची मोठ्या प्रमाणात खरेदी होत होती. याशिवाय मधला अंबा मंदिर परिसर, मोची गल्ली जवाहर रोड, रुख्मिणी सुका मेवा गिफ्ट्सचे यंदा आकर्षण दिवाळीच्या उत्सवात अलीकडच्या काळात सुकामेवा आणि चॉकलेट्सचे गिफ्ट बॉक्स देण्याची क्रेझ वाढत आहे. यंदाही विविध आकर्षक बांधणी असलेले गिफ्ट बॉक्स बाजारात आले आहेत. त्यामध्ये लखनवी व दिल्लीहून आलेल्या सुकामेव्यांच्या गिफ्ट बॉक्सना अधिक मागणी आहे. याशिवाय भारतीय कंपन्यांसह विदेशी कंपन्यांचे चॉकलेट गिफ्ट बॉक्सची खरेदी मोठ्या प्रमाणावर होत आहे. नगर, अन्य परिसरात पूजेसाठी लागणारे केळी खुंट, विड्याची पाने, लक्ष्मीची मूर्ती, डाळिंब, पेरू, सफरचंद, सीताफळ, मोसंबी, केळी, चिकू, आवळा आणि इतर फळांचीही खरेदी करण्यात येत आहे. तसेच बत्तासे, साखर-फुटाणे, लाह्या, भेंड, फुटाणे आदी वस्तूंनाही मागणी दिसून आली. या एकत्रित वस्तूंची किंमत बाजारपेठेत शंभर रुपये किलोपर्यंत आहे. शिवाय सुगंधी उटणे, राजकोट तेल त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारचे धूप, अगरबत्ती यांचीही विक्री होत आहे. दिवाळीच्या लक्ष्मीपूजनाचे महत्त्व लक्षात घेऊन फुलांच्या बाजारातही झेंडू आणि इतर फुलांची मोठी आवक झाली.

परंपरेला मान देत वहीपूजन रोजमेळ, कीर्द खतावणी, नोंदवही, लक्ष्मी वही, कलेक्शन बुक या रोजच्या जमा खर्चाच्या वह्या संगणकीय युगात कालबाह्य होऊ लागल्या असल्या तरी धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर सहा-सात प्रकारच्या वह्यांऐवजी मुहूर्तासाठी एखादी वही खरेदी करण्याकडे कल दिसून आला. यंदा विक्रीत घट झाली असली तरी व्यापारी पेढ्या, दुकाने, कारखाने, उद्योगधंद्यांच्या दृष्टीने पाडव्याला वहीपूजनाचे महत्त्व असल्याने परंपरेला मान देत आजही वही खरेदी होते.

## 'माझी शाळा सुंदर शाळा' उपक्रमात मनपा शाळा तालुक्यात अव्वल स्थानी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

शाळांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हावे तसेच उत्कृष्ट कार्य करणारा शाळांना प्रोत्साहन मिळावे. या उद्देशाने राज्य शासनाच्या वतीने 'माझी शाळा सुंदर शाळा' हा उपक्रम मागील वर्षापासून सुरू केला आहे. याचा दुसरा टप्पा मागील महिन्यात पार पडला. त्या अनुषंगाने मनपा शाळांनी यामध्ये नोंदणी केलेली होती. शासकीय आणि खासगी अशा दोन गटांमध्ये उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शाळांना यामध्ये बक्षीस दिले जाणार होते. त्या अनुषंगाने सर्व शाळांनी स्पर्धेत विजयाकरिता प्रयत्न केले. अमरावती पं. स. अंतर्गत शासकीय गटातून पहिल्या तिन्ही क्रमांकावर अमरावती मनपा शाळांनी बाजी मारली असून, यामुळे मनपाच्या शाळांमध्ये भौतिक सुविधा व विद्यार्थी गुणक्ता विकासात वाढ होत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा जेवडने प्रथम क्रमांक पटकावला. मनपाउच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १४ वडाळीने दुसरा, तर मनपा उच्च प्राथमिक मराठी शाळा क्रमांक १७ विलास नगरने तिसरा क्रमांक पटकावला आहे.

या सर्व शाळांच्या मुख्याध्यापक व शिक्षकांना मनपाचे आयुक्त सचिन कलंत्रे, अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, मनपा उपायुक्त मेघना वासनकर, शिक्षणाधिकारी डॉ. प्रकाश मेश्राम, शाळा निरीक्षक वहिद खान, योगेश पखाले, ज्योती बनसोड, संध्या वासनिक यांच्या उपस्थितीत कार्यक्रमात स्मृतिचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान उपस्थित सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांना स्वीप उपक्रमांतर्गत मतदानाची शपथही या वेळी देण्यात आली. सूत्रसंचालन पंकज सपकाळ व आभार योगेश पखाले यांनी मानले.

### आधुनिक सुविधा पुरवणार : मनपा आयुक्त

येत्या काळात महापालिकेच्या शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी सर्व प्रकारच्या आधुनिक तंत्रज्ञानाशी संबंधित गुणवत्तापूर्ण तसेच भौतिक सुविधा पुरवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मनपा आयुक्त कलंत्रे यांनी सांगितले. तसेच अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक व उपायुक्त मेघना वासनकर यांनी विजयी शाळांचे अभिनंदन केले व इतर शाळांच्या मुख्याध्यापकांना यापासून प्रेरणा घेण्यास सांगितले.

## निवडणूक प्रतिज्ञासह विचारांच्या दीपोत्सवाला सुरुवात

### पहिला दिवा तिला : वैचारिक वेशभूषेतून महिलांचा अनोखा दीपोत्सव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

राज्यात सर्व निवडणुकीचा माहौल असताना फटाक्यांची आतिषबाजी व काही दीपावली परंपरेला फाटा देत अमरावतीमध्ये आम्ही सावित्रीच्या लेकी प्रतिष्ठान व जेसीआय गोल्डन प्रिन्सेस यांच्या संयुक्त विद्यमाने थोर महापुरुषांच्या प्रतीमेसमोर पहिला दिवा प्रज्वलित करून 'विचारांचा दीपोत्सव' साजरा करण्यात आला. दिनांक २७ ऑक्टोंबर रोजी सायंकाळी ६ च्या सुमारास स्वामी विवेकानंद थीम पार्क, कठोरा नाका परिसरात आयोजित या कार्यक्रमांत महापुरुषांना साक्षी मानत यावेळी स्वीप उपक्रम अंतर्गत निवडणूक जनजागृती संदर्भात उपस्थितांनी प्रतिज्ञा घेतली.

ज्या महापुरुषांच्या विचार व कार्यामुळे सर्व जातीधर्मातील स्त्री पुरुषांना माणूस म्हणून जगण्याचा आणि सारे सण-उत्सव साजरे करण्याचा अधिकार मिळाला त्या राष्ट्रमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज, राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीमाई फुले, अहिल्याबाई होळकर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, माता रमाई , फातिमा बेग यांच्या त्यागाचे स्मरण करून त्यांच्या प्रतिमासमोर दीपावली उत्सवातील पहिला दिवा लावण्यात आला. व्यवसाय व नोकरी क्षेत्रात कार्यरत महिलांनी दिवसभर निवडणूक प्रशिक्षणाचे कर्तव्य पार पाडत सायंकाळी आगळ्यावेगळ्या वैचारिक दीपोत्सव कार्यक्रमाचे आयोजन केले.

महात्मा फुले बँकेच्या संचालिका राजश्री जढाले यांच्या अध्यक्षतेत घेण्यात आलेल्या या कार्यक्रमाला जेसी डॉ. भावना उताणे, वैशाली जाधव, अनिता खवले, आम्ही सावित्रीच्या लेकी फाऊंडेशन सावित्री शक्तीपिठाच्या अध्यक्षा वैशाली धाकुलकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामगीताचार्य ज्ञानेश्वर टाले यांनी वैचारिक पुष्प गुंफले. यावेळी अजय राऊत यांनी ज्योतिराव फुले, दीपिका अर्बाळ यांनी इंदिरा गांधी, प्रतिमा आठवले, नयन राऊत यांनी सावित्रीमाई फुले,सुषमा बगाडे यांनी अहिल्याबाई होळकर, आरती देशमुख यांनी झाशीची राणी लक्ष्मीबाई या थोर व्यक्तींची वैचारिक वेशभूषा साकारली.

या कार्यक्रम प्रसंगी प्रशांत डवरे, संदीप खवले, सुप्रीम देशमुख, श्रीकांत नागरीकर, सतीश तायडे, लता चिंचोळकर, अनिता खवले, सुनीता तायडे, जयश्री कुबडे, संतोष तायडे, गजानन व्यवहारे, मंगल देशमुख, डॉ.उज्वला टांक, वनिता बोरोडे, रेखा होले, संगीता ढोक, ऍड सपना विधळे, छाया बर्वे, श्याम तायडे, माधुरी देशमुख, शुभांगी टाकळे, प्रतिमा आठवले, अजय राऊत, प्रा.डॉ.श्रीधर धाकुलकर आदींच्या उपस्थिती होती.

## सुव्यवस्थेसाठी आजपासून कलम ३६ लागू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अमरावती**

जिल्ह्यात आगामी काळात सण उत्सव साजरा होणार आहे. तसेच नामांकन पत्र दाखल करण्याचा मंगळवार, २९ ऑक्टोबर हा शेवटचा दिवस असल्याने मोठ्या प्रमाणात उमेदवार नामांकन पत्र दाखल करणार आहेत. सभांचे आयोजन व शक्तिप्रदर्शनासाठी मिरवणूक निघेल. विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने आचारसंहिता लागू झाली असून या काळात कायदा व सुव्यवस्थेसाठी महाराष्ट्र पोलिस कायद्याच्या कलम ३६ नुसार पोलिस आयुक्तालय परिसरातील सर्व पोलिस ठाणेदार, अंमलदार व त्यांच्यावरील अधिकाऱ्यांना



२९ ऑक्टो. ते १२ नोव्हेंबरच्या मध्यरात्रीपर्यंत अधिकार प्रदान करण्यात आल्याचे आदेश पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी निर्गमित केले आहेत.

रस्त्यावरून जाणारी मिरवणूक सुरळीत ठेवणे, उपासनास्थळी गर्दी होऊ न देणे, सर्व मिरवणुकीप्रसंगी व पूजा-अर्चा या ठिकाणी अडथळा होऊ न देण्यासाठी याठिकाणी बंदोबस्त ठेवणे, सार्वजनिक जागेत ध्वनिक्षेपकाच्या वापराबाबत नियम व नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे. सक्षम अधिकाऱ्यांनी या कायद्याच्या कलम ३३, ३५, ३७ ते ४०, ४४ व ४५ नुसार कारवाई करावी, असे पोलिस आयुक्त यांच्या आदेशात नमूद केले आहे.

## विदर्भातील पाच हजार गावे ढाल पुजनासाठी सज्ज दिवाळीच्या पर्वावर साजरा होणार उत्सव

### पूर्व विदर्भात रंगीत तालीमला सुरूवात आदिवासी गोवारीची परंपरा आजही कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९धामणगाव रेल्वे**

चकाचका चांदणी वो गोवारीयो बिनो, गायनेसे कोटा भरे, घरघर देबो आशीष गा, अशा दादऱ्याच्या निनादात व गोहळा- गोहळीचे नृत्य करण्याकरीता विदर्भातील पाच हजार गावे ढाल पुजन उत्सवासाठी सज्ज झाली असून दिवाळीच्या पाडव्याला हा ढाल पूजन उत्सव पारंपारीक पध्दतीने साजरा होणार आहेपूर्व विदर्भातील गावात रात्रीला पूर्व तयारी व सरावासाठी रात्र जागून काढली जात आहे.आदीवासी गोवारी समाजासाठी दिवाळीचा पाडवा हा पर्वणी ठरत असते यंदा पाच हजार गावामध्ये ढाल पूजन उत्सव साजरा होणार आहे. गावातील गुरे ढोरे चारणे हा मुख्य व्यवसाय गोवारी जमातीचा आहे. वर्षभर गावातील गोपालकांचे जनावरे केवळ महिन्याकाठी मिळणाजया दहा ते पंधरा रूपयात गोवारी जमातीतील बांधव आजही चारतात दिवाळीच्या पाडवा म्हणजे वर्षातील सर्वात मोठा दिवस या जमातीसाठी असतो गावातील गोवारी जमात एकत्र येतात. गोवारी नृत्याला अशी होते सुरूवात सकाळी गावातील जनावरांना लक्ष्मी सारखे सजवतात सायंकाळी सर्व गायी गुरे गावामधून फिरवून फटाक्याच्या आतीश बाजीत प्रत्येक गाय हंबरे पर्यंत नाचवीण्यात येते. तत्पुर्वी दोन बाशावर फाडक्या बांधून पुरूष ढाल म्हणजे गोहळा तर स्त्री ढाल - गोहळी अशी उभारण्यात येते. दुपारी प्रथम सुताजयाच्या घरी पाणी पिण्याकरीता ढालीला नेल्यानंतर खऱ्या अर्थाने याच वेळी आदीवासी गोवारी नृत्याला प्रारंभ होते. डफळी व मुरलीच्या निनादात दादऱ्याची मैफल रंगल्याने नृत्यात अधीकच रंगत येते. हा उत्सव दिवाळीच्या दुसजया दिवशी गावा गावात साजरा करण्यात येते. या उत्सवात गावातील प्रत्येक ग्रामस्थ सहभागी होतेय़ा उत्सवाला सव्वाशे वर्षांची परंपरा आहेपूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा, नागपूर, वर्धा या जिल्ह्यात हा उत्सव सतत तिन दिवस चालतोड़फळी तयार करून नृत्य सादर करण्याचा सराव सुरू झाला आहे. रात्रभर हा सराव अनेक गावात आज सुरू आहे. वर्षभर गायीचे राखन करणारे गोवारी बांधव गावातील गावातच धान्य गोळा करून या धान्याने संपूर्ण गावाला अन्नदान करण्यात येते. अर्जुनाचा सारथी म्हणून गोवारी ची ओळख आज गोवारी समाजाच्या तीन पिढ्या खजया न्याय हक्काच्या लढ्यासाठी दोन हात करीत आहे.आर्थीक स्थिती हलाकीची आहे. परंतू महाभारतामध्ये अजूर्नाचा सारथी असलेला श्रीकृष्णाचा सवंगडी व गोपालन करणारा म्हणून गोवारी समाजाची ओळख आहे. आजाच्या विज्ञान युगात गोवारी समाजातील युवा पिढी ढाल पुजन उत्सवाची परंपरा चालवीत आहे.

> स्वातंत्र्य पूर्व काळापासून गोवारी जमात ही आदीवासी आहे. या जमातीचे आदीवासीचे पुरावे काँग्रेसच्या काळात केंद्र व राज्यशासनाला अनेकवेळा या जमातीच्या संघटनेने दिली आहे. एवढेच नव्हेतर न्याय हक्काच्या लढाईसाठी ११४ गोवारींना २३ नोव्हेंबर १९९४ रोजी शहीद व्हावे लागले.आजही हा समाज हातावर आणून पानावर खान्याचे काम करून अठरा विश्व दारिद्र्यात जगत आहे.संगणक युगात आपली आदीवासीची परंपरा जपणाऱ्या या गोवारी जमातीला आदीवासीचा दर्जा मिळाला नाही.
>
> **नंदू सहारे अध्यक्ष आदीवासी गोवारी युवा शक्ती**



## शेवटच्या दिवशी अमरावती मधून सुलभा खोडके,सुनील देशमुख,जगदीश गुप्ता तर बडनेरा मधून रवी राणा ,सुनील खराटे,तुषार भारतीय यांनी केले नामांकन दाखल

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या नामांकन दाखल करण्याच्या आज शेवटच्या दिवशी बडनेरा मतदार संघातून युवा स्वाभिमान व महायुतीचा पाठिंबा असलेले आ.रवी राणा,महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे व भरतीत जनता पक्षात बंडखोरी करून उभे असेलेले तुषार भारतीय यांनी जोरदार शक्ती प्रदर्शन करीत आपापले अर्ज दाखल केले तर अमरावती विधानसभा मतदार संघात महायुतीच्या सुलभ खोडके, महाविकास आघाडी तर्फे डॉ.सुनील देशमुख भाजप मधून बंडखोरी करून उभे असलेले माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता त्यांच्या असं अनेक अपक्ष उमेदवारांनी आपला अर्ज दाखल केला.










विधासभा निवडणुकीचा नामांकन अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस असल्या कारणाने आज अमरावती तहसील कार्यालयात उमेदवारांनी प्रचंड गर्दी केली होती शहरात संपूर्ण राजकीय वातावरण हे रॅलीच्या माध्यमातून तापलेले होते आ.दार रवी राणा यांनी राजापेठ येथून रॅली काढत जोरदार शक्ती प्रदर्शन केले तर महविकास आघाडीचे उमेदवार सुनील खराटे यांनी महेश भवन येथून नामांकन दुचाकी तेली काढत शक्ती प्रदशन केले यावेळी खासदार अनिल देसाई हे प्रामुख्याने उपस्थित होते. तर बंडखोर तुषार भारतीय यांनी दसरा मैदान येथून रॅली काढत जोरदार शक्तीप्रदर्शन केल. अमरावती विधानसभा मतदार संघाकरीता सुलभ खोडके यांनी गाडगेबाबा समाधी मंदिर येथून नामांकन रॅली ला सुरुवात केली व जोरदार शक्तीप्रदर्शन केले. तर महाविकास आघाडीचे उमेदवार सुनील देशमुख यांन वालकट कंपाउंड येथील धर्मदाय कॉटन फंड या ठिकणावरून रॅलीला सुरुवात केली. अमरावती मध्ये जवळपास चौरंगी लढत होत असल्याचे चित्र जवळपास निश्चित झाले आहे तर बडनेरा मतदार संघात पंचरंगी लढत होणार असल्याचे पाहवयास मिळणार आहे. नामांकन अर्ज परत घेण्याची तारखेनंतर आता प्रचाराची रणधुमाळी सुरु होणार आहे.

## अकोल्यात ३ मतदारसंघात बंडखोरी महायुतीपुढे मोठे आव्हान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९ अकोला**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अकोल्यामध्ये मोठ्या राजकीय घडामोडी घडत आहेत. अकोल्यात भाजप आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत देखील बंडखोरी होणार आहे. बाळापूर, अकोला पश्चिम आणि मूर्तिजापूर मतदार संघात बंडखोरी होणार आहे. या तिन्ही मतदारसंघात नाराज असलेल्या कार्यकर्त्यांवर तिसऱ्या आघाडीने लक्ष धरून उमेदवारी जाहीर केलीय. बाळापूर मतदारसंघात अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष कृष्णा अंधारे यांनी बच्चू कडूंच्या तिसऱ्या आघाडीत प्रवेश केला. अंधारे हे बाळापुर मतदारसंघातून इच्छुक होते. मात्र बाळापूर जागा महायुतीमधील शिंदे गटाच्या वाटेवर गेल्याने ते नाराज होते.

तर मविआतील शरद पवारांच्या राष्ट्रवादीने मूर्तिजापूरातून सम्राट डोंगरदिवे यांना उमेदवारी दिल्याने रवी राठी नाराज होते. त्यांनी राष्ट्रवादीला रामराम ठोकत भाजपमध्ये प्रवेश केला होता. तिथेही भाजपनं मूर्तिजापुरातून पुन्हा चौथ्यांदा विद्यमान आमदार हरीश पिंपळे यांना संधी दिली. त्यामुळं आता रवी राठी यांनी बच्चू कडूंच्या तिसऱ्या आघाडीची वाट धरली आहे.अकोला पश्चिम मतदारसंघातही भाजपात बंडखोरी होणार आहे. भाजपाचे प्रदेश कार्यकारणी सदस्य आणि माजी शहराध्यक्ष डॉ. अशोक ओळंबे हे बच्चू कडू यांच्या प्रहार जनशक्ती पक्षात गेले. अकोला पश्चिममधून डॉ. ओळंबे हे बच्चू कडू यांच्या पक्षाचे परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीचे उमेदवार असणार आहे.

अकोल्यात भाजपाने माजी महापौर विजय अग्रवाल यांना उमेदवारी दिल्याने डॉ. ओळंबे नाराज होते. डॉ. ओळंबे हे अकोल्यातील भाजपचे अंतर्गत राजकारणात डॉ. रणजीत पाटील गटाचे म्हणून ओळखले जातात. डॉ. अशोक ओळंबे कोणत्याही परिस्थितीत माघार घेणार नसल्याचा त्यांचा समर्थकांच्या बैठकीत निर्धार केला आहे. आज अकोला पश्चिममधून ओळंबे, बाळापूर मतदारसंघातून कृष्णा अंधारे आणि मूर्तिजापूरातून रवी राठी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे.दरम्यान, बच्चू कडू यांच्या पक्षाचे परिवर्तन महाशक्ती या तिसऱ्या आघाडीचे अकोला जिल्ह्यातील ४ मतदारसंघात उमेदवार असणार आहे. अकोट, बाळापूर, मुर्तीजापूर आणि अकोला पश्चिम या मतदारसंघात तिसरी आघाडी आपले उमेदवार देणार आहे. या तिसऱ्या आघाडीच्या उमेदवारामुळे मतांचे विभाजन होत नेमकं कुणाला फायदा आणि कुणाला तोटा होणार? हे पाहणं तितकंच महत्त्वाचं ठरणार आहे.

## जिल्हा स्वीप कक्ष जि.प.अमरावती एक दिवा मतदारांच्या सन्मानाचा





**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

जिल्हा स्वीप कक्ष जि.प.अमरावती,महीला आर्थिक विकास महामंडळ व महीला व बाल विकास कार्यालय अमरावती तर्फे सोमवार दिनांक २८ऑक्टोबरला अमरावती येथे दिपोत्सव व मतदान जनजागृती कार्यक्रम साजरा करण्यात आला.यावेळी सौ.संजीता महापात्र (भाप्रसे),नोडल अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जिप अमरावती यांचे शुभ हस्ते दिवा लावून उदघाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला सुनील सोसे जिल्हा समन्वयक माविम , विलास मरसाळे ऊूउएज मबाक, उमेश टेकाडे जिल्हा महिला व बालविकास अधिकारी , डॉ. प्रकाश मेश्राम शिक्षणाधिकारी तथा महिला व बालविकास अधिकारी मनपा अमरावती, युवा प्रशिक्षणार्थी , माविम तालुका संघटक, स्वीप टीमचे ज्ञानेश्वर घाटे,संजय राठी,नितिन माहोरे,हेमंतकुमार यावले,राजेश सावरकर उपस्थित होते.यावेळी सर्वांनी दिप प्रज्वलीत करुन फटाक्यांच्या आतिश बाजित दिपोत्सव साजरा करण्यात आला.उपस्थित मान्यवरांना जिल्हा नोडल अधिकारी संजीता मोहपात्र यांनी दिवाळी सणा निमित्य शुभेच्छा देऊन मतदान जनजागृती करण्याबाबत आवाहन केले.

## ११ हजार कोटींचा नफा तरी फिनले मिल बंद चार वर्षात १६ कामगारांनी केली आत्महत्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अचलपूर**

अचलपूर येथील प्रसिद्ध फिनले मिल ही विदर्भातील कापड निर्मितीत अग्रेसर असणारी गिरणी (मिल) कोरोना काळापासून बंद आहे. ११ हजार कोटी रुपये वर्षाला नफा असणारी ही मिल बंद पडल्यामुळे येथील हजारो कामगार बेरोजगार झालेत. शासकीय मिल बंद पडल्यानंतर १६ कामगारांनी आत्महत्या केली. आपल्याला न्याय मिळेल का, याची जवळपास ४०० कामगारांना दिवाळीतदेखील प्रतिक्षा आहे.

कोरोना काळापासून अचलपूर येथील फिनले मिल बंद आहे. मिल आज सुरू होईल. उद्या सुरू होईल, या अपेक्षेनं मिलमध्ये काम करणाऱ्या कामगारांवर आज मजुरी काम करण्याची वेळ आली. मिल सुरू होईल, या अपेक्षेत कामगारांनी आपल्या कामाचा राजीनामा दिला नाही. अद्याप, भविष्यात ही मिल सुरू होईल. आपला फायदा होईल, अशी अपेक्षा बाळगून असणाऱ्या गिरणी कामगारांवर चक्क उपासमारीची वेळ आली.





केवळ आश्वासनांची खैरात–मिल लवकरच सुरू होईल. आपला उर्वरित पैसा मिळेल. दिवाळीत बोनस मिळेल, अशा आश्वासनांची खैरात सातत्यानं दिली जाते. वास्तवात मात्र कामगारांच्या पदरी निराशाच पडत आहे, अशी खंत गिरणी कामगार संघटनेचे सदस्य राजेश गौड यांनी व्यक्त केली.

२००९ मध्ये सुरू झालेल्या फिनले मिलमध्ये प्रत्यक्षात २०११ मध्ये कापड निर्मिती सुरू झाली. १००० कामगार या ठिकाणी कार्यरत असून अतिरिक्त दोन ते तीन हजार मजुरांना अप्रत्यक्ष रोजगार येथे उपलब्ध होता. चार ते पाच वर्षांपासून काम बंद असल्यामुळे मधल्या काळात केवळ अर्धा पगार मिळायचा. उर्वरित अर्धा पगार मिळेल, असं आश्वासन देण्यात आलं. मात्र, अद्यापही अर्धा पगार मिळाला नाही. दिवाळीकरिता कामगारांना त्यांच्या हक्काचे पैसे मिळाले तर त्यांची दिवाळी आनंदात साजरी होईल. ही गिरणी बंद झाल्यामुळे काही मजुरांनी आत्महत्या केली. अशा संवेदनशील मुद्द्याचा शासनानं आणि लोकप्रतिनिधींनी योग्य विचार करावा. लोकप्रतिनिधींनी श्रेयवादापेक्षा माणुसकी म्हणून या गंभीर विषयाकडे लक्ष द्यावं, असं गिरणी कामगार संघटनेचे सहसचिव गिरीश उघडे म्हणाले. चार वर्षांपासून थकीत असणारा आमचा अर्धा पगार आणि बोनस तात्काळ मिळावा. आमची दिवाळी देखील सर्वांसारखी सुखद व्हावी, अशी अपेक्षा गिरणी संघटनेचे उपाध्यक्ष राजेश ठाकूर यांनी व्यक्त केली.

**या कामगारांनी केली आत्महत्या**

२०२० पासून फिनले मिल बंद झाल्यामुळे आर्थिक अडचणीचा सामना करणं कठीण झाला. १६ कामगारांनी आत्महत्या केली. अंकुश निरगुळे, किरण भुजाडे, सुनील कावरे, अंकित कामवीसदार, आदित्य मोहोड, प्रशांत ठाकूर, निलेश राऊत, निखिल हाडोळे, सुनील कोल्हापुरे, दिनेश जामुनकर, राहुल दरवणे, पियुष वाहुलकर, विजय दाभाडे , अमित डेरे, प्रवीण लकडे आणि सय्यद कलीम अशी आत्महत्या केलेल्या कामगारांची नावे आहेत.

केवळ अचलपूरची फिनले मिल ही बंद नाही. तर देशातील अशा एकूण २३ मिलमधलं काम केंद्र शासनानं थांबवलं. गेल्या सहा ते सात महिन्यांपासून अचलपूर येथील फिनले मिलमध्ये काम बंद आहे. एकूण ४८५ कामगारांपैकी चारशे कामगारांना सध्या बंद करण्यात आलं आहे. काही कामगारांना मिल मधल्या मोजक्या कामासाठी ठेवण्यात आलं आहे, असं स्पष्टीकरण अचलपूर येथील फिनले मिलचे व्यवस्थापक अमित कुमार सिंह यांनी दिली

अचलपूर येथे विदर्भ मिल लिमिटेड या कंपनीमार्फत कापड निर्मिती उद्योगाला १९२५ मध्ये सुरुवात झाली. त्यावेळी एकूण २ हजार कामगार गिरणी मिलमध्ये कामाला होते. ही मिल पहिल्यांदा १९५९ मध्ये बंद पडली. राज्य वस्त्रोद्योग महामंडळानं १९७२ मध्येही मिल ताब्यात घेतल्यावर १९७४ मध्ये मिल राष्ट्रीयकृत झाली. त्यानंतर ही मिल २००३ मध्ये बंद पडली. अमरावतीच्या प्रतिभा पाटील या देशाच्या राष्ट्रपती झाल्यावर त्यांनी २००८ मध्ये फिनले मिलची पायाभरणी केली. सुमारे ३२६ कोटी रुपयांची गुंतवणूक करून नव्यानं ही मिल उभारण्यात आली.

## भेसळयुक्त लोणी, तुपाचा ४५० किलोचा साठा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

अन्न व औषध प्रशासनाला मिळालेल्या माहितीनुसार जिल्हा दूध, दही भेसळ समितीने मुदलियार नगर येथील दूध डेअरीवर छापा टाकला. या ठिकाणी भेसळ केल्याच्या संशयावरून विनालेबल असलेल्या तूप व लोण्याचा एकूण १ लाख ८० हजार ६०० रु. किमतीचा ४५० किलोचा



साठा नमुने घेऊन जप्त करण्यात आला. ही कारवाई जिल्हा दूध भेसळ समितीचे अध्यक्ष अपर जिल्हाधिकारी सूरज वाघमारे व भाऊराव चव्हाण सहायक आयुक्त अन्न व औषधी प्रशासन यांच्या मार्गदर्शनात अन्न सुरक्षा अधिकारी गजानन गोरे, संदीप सूर्यवंशी, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. तुषार गावंडे, दूधशाळा व्यवस्थापक विनोद पाठक यांनी केली.

## उत्सव लोकशाहीचा, सन्मान मतदारांचा अमरावती जिल्ह्यात दिवोत्सव साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२९अमरावती**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदार जागृतीसाठी अमरावती जिल्हा प्रशासनाच्यावतीने उत्सव लोकशाहीचा, सन्मान मतदारांचा या थीमवर दीपोत्सव साजरा करण्यात आला. जिल्हा निवडणूक आयोगाच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत एक दिवा मतदाराच्या सन्मानासाठी या संकल्पनेने दिव्यांचा उजळणारा उत्सव आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात माविम तर्फे किमान एक लाख मतदारांना मतदानाचा



संकल्प घेण्याचे उद्दिष्ट ठेवल्याचे सांगण्यात आले.उत्सव लोकशाहीचा.. सन्मान मतदारांचा दिपोत्सव.. एक दिवा मतदारांच्या सन्मानासाठीदीपोत्सवाचे उद्घाटन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या हस्ते करण्यात आले. महापात्र यांनी मतदारांना त्यांच्या हक्काच्या वापराचे महत्त्व पटवून दिले आणि लोकशाही सुदृढ करण्यासाठी प्रत्येक मताचे योगदान आवश्यक असल्याचे अधोरेखित केले.या वेळी मतदारांना मतदान प्रक्रियेबद्दल जागृती करून देण्यात आली तसेच त्यांच्या हक्काचा योग्य वापर करण्याची जाणीव करून देण्यात आली.